**आरोग्यदायी आहार** घेतल्यास त्या व्यक्तीची ऐकण्याची क्षमता (श्रवणक्षमता) कमी होण्याची जोखीम कमी होते, असा दावा अभ्यासकांनी केला आहे.

या अभ्यासाचे निष्कर्ष 'अमेरिकन जर्नल ऑफ इपिडेमिलॉजी'मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या अभ्यासात सरासरी ६९ वर्षे वयाच्या गटातील महिलांची ऐकण्याची संवेदना तीन वर्षांच्या कालावधीत कशी बदलत गेली, हे पाहण्यात आले.

ज्या महिलेचा आहार सर्वसाधारणपणे आरोग्यदायी आहाराचे निष्कर्ष पूर्ण करणारा होता, त्या महिलेची ऐकण्याची क्षमता कमी होण्याची जोखीम ही अन्य महिलांच्या तुलनेत कमी होती, असे या अभ्यासकांना आढळून आले.

अमेरिकेतील 'ब्रिगहॅम ॲण्ड वुमेन्स हॉस्पिटल'मधील तज्ज्ञ आणि या अभ्यासाच्या शीर्ष लेखिका शेरॉन कुऱ्हन यांनी सांगितले की, ''सर्वसाधारणपणे असा समज आहे की, व्यक्तीची ऐकण्याची क्षमता ही त्याच्या वाढत्या वयाबरोबर कमी होत जाते. पण या प्रक्रियेतील जोखमीचे कोणते घटक बदल घडवता येऊ शकेल, अशा स्वरूपाचे असतात हे जाणून घेण्याचा आमचा प्रयत्न होता. उदाहरणार्थ श्रवणक्षमता गमावू नये किंवा ती कमी होण्याची प्रक्रिया लांबणीवर पडावी यासाठी आपण आपल्या आहारात आणि जीवनशैलीत कोणता बदल घडवला पाहिजे, यावर आम्ही लक्ष केंद्रित केले होते.''

आरोग्यदायी आहाराची पद्धत आणि पथ्ये अवलंबल्यास त्यातून आरोग्यासाठी अनेक सकारात्मक परिमाण साधले गेल्याचे दिसून येते. आरोग्यदायी आहार घेतल्यास श्रवणक्षमता गमावण्याची जोखीम कमी होण्यास मदत होते, असेही आढळून आले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.




**लोकसत्ता**

**20 November 2019**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

***Section: Achievements and Awards***

Sakal 10.11.2019

## विद्यापीठास मिळाले अखेर अधिष्ठाता

### मनोहर चासकर, अंजली कुरणे, पराग काळकर यांची निवड



डॉ. कुरणे



डॉ. चासकर



डॉ. काळकर

पुणे, ता. ९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या अधिष्ठातापदी डॉ. मनोहर चासकर, मानव्यविज्ञान शाखेसाठी डॉ. अंजली कुरणे आणि वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या अधिष्ठातापदी डॉ. पराग काळकर यांची नियुक्ती करण्यात आली; तर आंतरविद्याशाखीय या विभागाचे अधिष्ठाता निश्चित झालेले नाहीत.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचे शैक्षणिक कामकाज पाहण्याची जबाबदारी अधिष्ठातांवर असते; परंतु चार विभागांना अधिष्ठाता नसल्याने विद्यापीठाने निवडप्रक्रिया राबविली होती. मुलाखतीनंतर या चारही विभागांचे अधिष्ठाता एकाच वेळी जाहीर केले जाणार होते. त्यामुळे ही प्रक्रिया रखडली होती. शेवटी आज तीन विभागांचे अधिष्ठाता जाहीर केले.

डॉ. चासकर हे २९ वर्षांपासून रसायनशास्त्र विषय शिकवत आहेत. त्यांनी जपान येथून उच्च शिक्षण घेतले आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे. पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद यावर काम केले आहे. सध्या ते परीक्षा मंडळाचे सदस्य आहेत.

डॉ. कुरणे यांना मानवशास्त्र विषयात अध्यापनाचा २८ वर्षांचा अनुभव आहे. पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाच्या त्या १० वर्षे विभागप्रमुख होत्या. सध्या त्या पुणे विद्यापीठातील मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे विभागाच्या संचालक आहेत.

डॉ. काळकर यांना फायनॅन्शियल मॅनेजमेंट या विषयाच्या अध्यापनाचा २३ वर्षांचा अनुभव आहे. ते गेली १० वर्षे सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक आहेत. त्यांचे २८ रीसर्च पेपर्स प्रकाशित झाले आहेत.

**सकाळ**

**10 November 2019**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

**Section : Science & Technology**



# ‘खेड’मध्ये सापडली मोहाची सर्वोत्तम प्रजाती

## जैवइंधनासाठी उपयुक्त; सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागातील संशोधकांची कामगिरी

पुणे, ता. २ : आदिवासींसाठी कल्पवृक्ष असलेल्या 'मोहा'ची सर्वोत्तम प्रजाती खेड तालुक्यात (पुणे जिल्हा) सापडली आहे. नऊ जिल्ह्यांतील सर्वेक्षण आणि संशोधनानंतर सरासरीपेक्षा १३ टक्के अधिक स्निग्ध पदार्थांचे उत्पादन देणारी ही प्रजाती आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील प्रा. दिगंबर मोकाट आणि संशोधक विद्यार्थी योगेश सूर्यवंशी यांनी हे संशोधन केले. या संबंधीचा शोधनिबंध 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ फार्मासिटिकल सायन्स अँण्ड रिसर्च' या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत नुकताच प्रकाशित झाला आहे.

राज्याच्या पश्चिम घाटातील मोहाच्या झाडांच्या प्रजातीचे प्रथमच सर्वेक्षण करण्यात आले. डॉ. मोकाट म्हणाले, ''मोहाच्या प्रमुख तीन प्रजाती आढळतात, त्यापैकी 'मधुका लाँजिफोलिया व्हरायटीना लॅटिफोलिया' या प्रजातीवर आम्ही लक्ष केंद्रित केले. नऊ जिल्ह्यांतील उत्कृष्ट दर्जाची १११ झाडे निवडली. प्रयोगशाळेतील चाचण्यांनंतर खेड तालुक्यातील झाडात अधिक स्निग्ध पदार्थ मिळाले.'' सामान्यतः मोहापासून फुलांचे आणि बियांचे उत्पादन मिळण्यासाठी आठ ते दहा वर्षे लागतात. परंतु कलम केल्यास तीन वर्षांतच उत्पादन घेणे शक्य होणार आहे.

मोहाच्या झाडाला लगडलेली फळे.

विद्यापीठात तयार करण्यात आलेली मोहाची कलमे.

**झाडाचे फायदे**

- रोजच्या वापरातील तेल, खाद्यपदार्थ आणि खतासाठी झाडाचा उपयोग आदिवासी करतात
- फुलांपासून शरीराला आवश्यक कॅल्शिअम, लोह मिळते. तसेच मद्यही मिळते.
- बियांपासून ओलिक ॲसिड, पामेटिक ॲसिड, स्टेरिक ॲसिड, लिनो ॲसिड यांसारखे स्निग्ध पदार्थ मिळतात.
- तेलाचा जैवइंधनासाठी वापर शक्य

“ मोहाची फुले आणि बियांपासून लाडू, बिस्किटे यांसह तेलाचे उत्पादन घेण्यात येते. दुर्लक्षित असलेल्या या झाडावरील संशोधनामुळे आदिवासींसह ग्रामीण शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे नवीन साधन प्राप्त झाले आहे. खेडमध्ये सापडलेल्या या प्रजातीचे नामकरण विद्यापीठाच्या नावावरून 'सावित्री मोहा', असे करण्याचा विचार आहे.
– प्रा. दिगंबर मोकाट,
वनस्पतिशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ

“ मोहाच्या झाडासाठी कलमाची पद्धत विकसित केली. त्यामुळे बियांचे, फुलांचे उत्पादन घेणे शक्य आहे. मोहातील 'ओलिक ॲसिड'चा वापर जैवइंधनाच्या स्वरूपात करणे शक्य आहे. ३०० कलमे विकसित केली आहेत. त्यांचे वाटप पाच शेतकऱ्यांना लागवडीसाठी केले. त्यामुळे संशोधनाचा उपयोग थेट शेतकऱ्यांना होत आहे.
– योगेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी

“ कलमी पद्धतीमुळे तीन-चार वर्षांत उत्पन्न मिळते. यामुळे आदिवासी आणि शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळते पण त्याचबरोबर डोंगर हिरवीगार राहण्यास मदत मिळणार आहे.
– चंद्रशेखर भडसावळे, लाभार्थी शेतकरी, नेरळ (जिल्हा- रायगड)

Scanned with CamScanner

**सकाळ**

**3 November 2019**




*Image Courtesy: Google*

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

**Section : Science & Technology**

## Now, researchers figure out how star explosions are detonated

PTI

**WASHINGTON:** In a first, researchers have developed a theory describing how the nuclear reaction behind supernovae bright and powerful explosion of stars is triggered.

The study, published in the journal Science, noted that one of the processes triggering the stellar explosions was the formation of a mysterious supersonic reaction wave called detonation.

The researchers, including those from the University of Connecticut in the US, said these enigmatic waves travel faster than the speed of sound, and are capable of burning up all of the star's material before dispersing into the vacuum of space. As part of the study, the researchers demonstrated the process of detonation formation from a slow flame using both experiments and numerical simulations carried out on some of the largest supercomputers in the US.



**POWERFUL:** A file photo of star explosions.

They applied the results to predict the conditions of detonation formation in one of the classical theoretical scenarios of a type of stellar explosion called a 1a supernova. This type of explosion, the study noted, happened when carbon and oxygen atoms are packed densely into around 1,000 tons per cubic centimeter in a star's core, and start burning to high temperatures in rapid nuclear reactions.

According to the researchers, the resulting explosion disrupts a star in a matter of seconds which ejects most of its mass while releasing a quantity of energy equal to what the star emits over its entire lifetime. For the detonation process to occur, it must be confined within a wall like setting with obstacles, or boundaries, confining the pressure waves released from the burning, the study noted.

With increasing pressure, the researchers said, shock waves form and grow in strength to the point when they can compress the reacting mixture igniting it, and produce a self-sustaining supersonic boundary.

Stars do not have walls, making the formation of a detonation very enigmatic, the study noted. The researchers developed a unified theory of turbulence-induced detonation which describes the mechanism and conditions for initiating the enigmatic process in thermonuclear explosions.

A reactive mixture, which burns and releases energy, when stirred up to create intense turbulence, builds up a catastrophic instability and may rapidly increase the pressure in the system.

This produces strong shocks that ignite a detonation, they said.

According to the researchers, thermonuclear combustion waves are similar to chemical combustion waves on Earth since they are both controlled by the same physical mechanisms.

SAKAL TIMES, 04.11.2019

**Sakal Times**
**4 November 2019**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

## Section : Science & Technology



# NEW SPECIES OF ASIAN JUMPING SPIDER NAMED AFTER TENDULKAR

TOI, 15.11.19

One of the greatest cricketers of all times, Sachin Tendulkar's name is rarely ever out of the spotlight. Six years have gone past since the batting great played his last Test match in front of a Wankhede stadium that was packed to the rafters but Tendulkar remains one of the biggest names in Indian cricket.

In what has to be one of the most unique ways to pay tribute to the master blaster, a research scholar pursuing a PhD in spider taxonomy decided to rename one of two newly discovered species after Tendulkar.

"I named (one spider) Marengo sachintendulkar because Sachin happens to be my favourite cricketer," Dhruv Prajapati was reported as saying. "Another name is inspired by Saint Kuriakose Elias Chavara who was a crusader in creating awareness about education in Kerala."

Prajapati is a junior researcher with the Gujarat Ecological Education & Research (GEER) Foundation. He said that the two new species are part of the Indomarengo and Marengo genus of Asian jumping spiders. — IANS

Sachin Tendulkar

Times of India
15 November 2019




*Image Courtesy: Google*

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

**Section : Science & Technology**



TOI, 20.11.2019

SHORT CUTS

## 'Protective' wasp species named after Idris Elba

A tiny new species of wasp which kills an invasive pest that threatens several crops in India has been named after British actor and musician Idris Elba, researchers say. The wasp was recently discovered in Guanajuato, Mexico, where it was found to parasitise the eggs of an invasive stink bug, called bagrada bug, which is a major pest of cruciferous vegetables. Researchers suggest that the species might prove to be a Heimdall-like "protector" for many crops. Elba played the character Heimdall in several Marvel movies.

**Times of India**
**20 November 2019**




*Image Courtesy: Google*

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

**Section : Science & Technology**

# 'Possibility of life': Saturn's moon Titan mapped for 1st time

**Washington:** Scientists on Monday unveiled the first global geological map of Saturn's moon Titan, including vast plains and dunes of frozen organic material and lakes of liquid methane, illuminating an exotic world considered a strong candidate in the search for life beyond Earth.

The map was based on radar, infrared and other data collected by Nasa's Cassini spacecraft. Titan (diameter 5,150km), is the solar system's second-biggest moon, behind Jupiter's Ganymede. It is larger than the planet Mercury.

Organic materials — carbon-based compounds critical for fostering living organisms — play a leading role on Titan. "Organics are very important for the possibility of life... which many of us think likely would have evolved in the liquid water ocean under Titan's icy crust," said planetary geologist Rosaly Lopes of Nasa's Jet Propulsion Laboratory.

"Organic materials can, we think, penetrate down to the liquid water ocean and this can provide nutrients necessary for life, if it evolved there," added Lopes, who led the research published in the journal Nature Astronomy.

On Titan, clouds spew hydrocarbons like methane and ethane — which are gases on Earth — in liquid form due to the moon's frigid climate. Rainfall occurs everywhere on Titan, but the equatorial regions are drier than the poles, said study co-author Anezina Solomonidou. Plains (65% of the surface) and dunes (17%) made up of frozen bits of methane and other hydrocarbons dominate Titan's mid-latitudes and equatorial regions, respectively.

Titan is the only solar system object other than Earth boasting stable liquids on the surface, with lakes and seas of full of methane being major features in its polar regions. Hilly and mountainous areas, thought to represent exposed portions of Titan's crust of water ice, represent 14% of the surface.

Noting that Earth has a bacterium that can survive just on a hydrocarbon called acetylene and water, the study's co-author, Michael Malaska, asked, "Could it or something like it live on Titan, deep in the crust or ocean where temperatures are a little warmer?" REUTERS

REUTERS



An artist's illustration of what hydrocarbon ice on a liquid hydrocarbon sea on Saturn's moon Titan might look like

TIMES SCHOLARS

TOI, 20-11-2019

**Times of India**

**20 November 2019**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING NOVEMBER 2019

***Section : Arts & History***

# कमतरता 'मोडी' साक्षर व्यक्तींची

## अद्याप ४.९९ कोटी मोडी कागदपत्रे वाचणे बाकी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शिवकालाच्या उदयापासून पेशवाई कालखंडापर्यंत आणि इंग्रजांचा अंमल सुरू झाल्यापासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंतची स्थित्यंतरे पुणे शहराने अनुभवली. मराठी स्वराज्याचे साम्राज्य होण्यापर्यंतच्या प्रवासात पुणे शहराचा इतिहासात दरारा निर्माण झाला. या स्थित्यंतराचे पैलू दडले आहेत मोडी लिपीत लिहिलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये. ही कागदपत्रे आहेत तरी किती... तर पुणे अर्काइव्ह म्हणजेच पेशवे दफ्तरात पाच कोटी कागदपत्रे असून, त्यातले चार कोटी ९९ लाख दस्ताऐवज वाचणे अद्याप बाकी आहेत. ते वाचले गेले, तरच इतिहासाचे अनेक पैलू नव्या पिढ्यांसाठी प्रकाशमान होणार आहेत.

'गेल्या वीस वर्षांपर्यंत मोडी लिपीतली ही कागदपत्रे वाचणाऱ्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी होती. त्यातही शिवकालीन, पेशवेकालीन, इंग्रजांच्या अंमलातली तसेच टाकाची मोडी असे त्याचे प्रकार आणि त्यातला फरक समजणारे तज्ज्ञ कमी आहेत. या वारशात दडलेल्या इतिहासाचे पैलू समोर येण्यासाठी त्यांचे वाचन होणे गरजेचे आहे. पेशवे दफ्तरात सुमारे पाच कोटी कागद आहेत, तर भारत इतिहास संशोधक मंडळात १० लाख कागद आहेत. पेशवे दफ्तरातले आतापर्यंत एक लाख कागद वाचून झाले आहेत,' असे ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि मोडीतज्ज्ञ पांडुरंग बलकवडे यांनी सांगितले. 'गेली काही वर्षे पुण्यात मोडी कागद वाचणाऱ्यांची संख्या मर्यादित होती. मात्र, आम्ही पुण्यात शंभर व्यक्तींना घेऊन एक चळवळ सुरू केली. पुणे अर्काइव्हमधल्या दहा लाख कागदपत्रांचे डिजिटायझेशन केले आहे. वर्षभरात पाच हजार कागदपत्रांचे लिप्यंतर केले आहे,' असेही ते म्हणाले.

भारत इतिहास संशोधक मंडळात मोडी अभ्यास प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. मात्र, त्याला सातत्याने अभ्यासकांचा प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. तसे झाल्यास कागदपत्रे वाचण्याच्या प्रक्रियेला हातभार लागेल, असे इतिहासतज्ज्ञांचे म्हणणे आहे.



राजमाता जिजाऊसाहेबांचे पत्र

### मराठी साम्राज्यावरील खंड लवकरच

मराठी साम्राज्याच्या इतिहासावर आधारित १०१ खंड प्रकाशित करण्याचा संकल्प छत्रपती शिवाजी महाराज अध्यासनाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. त्यातले पहिले तीन खंड पुढच्या वर्षाअखेरीस अभ्यासकांसमोर येणार आहेत. त्या विषयी 'मटा'शी बोलताना बलकवडे म्हणाले, 'सिंहगड रस्त्यावरील वीर बाजी पासलकर स्मारक इथे या अध्यासनाची स्थापना झाली. त्या वेळी इतिहासातल्या विविध विषयांवर आधारित १०१ खंड प्रकाशित करण्याचा संकल्प सोडण्यात आला. त्यासाठी २५ मोडी जाणकारांना एकत्र करून त्यांच्या घरी कम्प्युटरवर कागदपत्रे उपलब्ध करून दिली जातात. ज्यांना कम्प्युटर हाताळता येत नाही अशा जाणकारांना त्याच्या कॉपी आम्ही देत आहोत. जेणेकरून अधिकाधिक कागद वाचले जातील. ७५ वर्षांपूर्वी रियासतकार सरदेसाईंच्या मार्गदर्शनाखाली ४५ खंड झाले. त्यानंतर असा प्रकल्पच झाला नाही. आता ७५ वर्षांनी एकाच दिवशी तीन खंड पुढच्या वर्षी डिसेंबर महिन्यात प्रकाशित केले जाणार आहेत.'

### वारसा सप्ताह

**महाराष्ट्र टाइम्स**

**22 November 2019**

# ARTICLE

## मराठी कादंबरीचे भाषिक भान

१

साहित्यप्रकाराची ओळख ही विशिष्ट अशा संकेतव्यवस्थेवरून निश्चित होत असते. अशा संकेतव्यवस्थेची निर्मिती ही साहित्यकृतीच्या निर्मितिप्रक्रियेत लेखकाने रचनातंत्राबाबत, आशयसूत्राबाबत, भाषेबाबत नेमकी कोणती भूमिका घेतली आहे, यावरून स्पष्ट होत असते. साहित्याला अस्तित्वरूप मिळतानाच त्याला अभिव्यक्तीसाठी आणखी एका गोष्टीचा वापर करावा लागतो. म्हणजे साहित्याला साहित्यरूप, अस्तित्वरूप मिळते ती भाषा या दुसऱ्या चिन्हव्यवस्थेच्या वापरामुळे. साहित्यकृतीचे पुन्हा विशिष्ट अशा साहित्यप्रकाराच्या संकेतव्यूहात रूपांतरण होताना देखील पुन्हा भाषिक स्वरूप आणि भाषिक अवकाश याच गोष्टी महत्त्वाच्या भूमिका बजावत असतात. त्यातूनच मग नाटक, कविता, कथा, कादंबरी यामधील भाषेचे स्वरूप आणि अवकाश बदलतो.

साहित्याच्या प्रकारभेदाचे आणखी एक विश्लेषण शक्य आहे. म्हणजे साहित्य या कलारूपात, तिच्या संकेतव्यूहातून निश्चित होणाऱ्या प्रकारभेदास स्वतः लेखक, वाचक यांनी गृहीत धरलेल्या काही गोष्टी कारणीभूत ठरत असतात. म्हणजे लेखकाचे भाषेवरील संस्करण जसे महत्त्वाचे ठरते तसेच त्या लेखकाने निर्मितिप्रक्रियेत आणि वाचकाने आस्वादप्रक्रियेत गृहीत धरलेल्या बाबीही एका विशिष्ट अशा संकेतव्यवहाराच्या जवळ जाणाऱ्या असतात. या प्रक्रियेचा शोध घेत गेल्यास साहित्यकलेत अंतर्भूत होणाऱ्या प्रमुख साहित्यप्रकाराच्या संकेतव्यवस्थेविषयी काही मूलभूत असे निष्कर्ष हाती येतात. अशा स्वरूपाच्या संकेतव्यवस्थेतील विशिष्ट गुणधर्मामुळेच एक साहित्यप्रकार हा अन्य साहित्यप्रकाराहून आपला वेगळेपणा टिकवून ठेवत असतो. याबाबत विचार करताना आपण कादंबरीच्या संकेतव्यवहाराविषयी एक अंदाज बांधू शकतो. कादंबरीविषयीच्या काही संकेतांनी लिहिता लेखक आणि त्याचा वाचक या दोघांच्या पातळीवरही काही अपेक्षा निर्माण होत असतात. कोणत्याही साहित्यकृतीच्या निर्मितिप्रक्रियेत आणि त्याच्या आस्वादप्रक्रियेत लेखक आणि वाचक यांनी गृहीत धरलेल्या संकेतव्यूहाचा परिणाम होत असतो. तसेच साहित्यकृतीच्या बाबतीत समानपातळीवर जाणाऱ्या संकेताने निर्माण होणारा समुच्चय हा एका विशिष्ट अशा विभागाची निर्मिती करतो. त्यालाच आपल्याला साहित्यप्रकार म्हणता येईल. अर्थात अशा संकेत समुच्चयातूनच एखाद्या साहित्यप्रकाराची संकेतव्यवस्था निर्माण होत असते. अशा संकेत समुच्चयांच्या भेदांवरूनच दोन साहित्यप्रकारातील भेद स्पष्ट करता येतात.

# ARTICLE

एखादा साहित्यप्रकार आणि त्याची संकेतव्यवस्था याविषयी वरीलप्रमाणे नमूद केलेल्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. याबाबत मग आपण कादंबरी या साहित्यप्रकाराचा विचार करू लागलो तर स्वतःच्या संकेतव्यवस्थेमुळे तिचे स्वतःचे असे काही गुणधर्म पुढे येतात. यातलाच एक भाग म्हणजे कथा, कविता, नाटक या साहित्यप्रकारांच्या तुलनेत कादंबरी हा साहित्यप्रकार त्याच्या संकेतव्यवस्थेतील खुलेपणाच्या अनेक शक्यतासह अभिव्यक्त होताना दिसतो. याला कारण ठरते ती कादंबरी या साहित्यप्रकारातील सर्वसमावेशक वृत्ती. कादंबरीत येणारी लवचीकता ही त्याच्या सर्वसमावेशक वृत्तीतूनच स्पष्ट करता येईल. कादंबरी या साहित्यप्रकाराच्या प्रकृतीधर्मातील वैविध्यामुळे अशा प्रकारच्या बंदिस्तपणातून तिची सुटका होत असते. या खुलेपणातूनच कादंबरीमध्ये विविध आवाज एकाच वेळी निर्माण आणि व्यक्त होण्यास वाव निर्माण होतो. अन्य साहित्यप्रकारात नेमके याच्या विरोधी होते. अशा प्रकारच्या सर्वसमावेशक वृत्तीच्या आणि खुलेपणाच्या अभावातूनच एका अर्थाने कथा, कविता, नाटक हे साहित्यप्रकार एका मर्यादित कक्षेत राहतात. संकेतव्यवस्थेतील काही एका विशिष्टतेमुळेच कादंबरीइतका अवकाश त्यांच्यात निर्माण होत नाही. याचा अर्थ कादंबरीचे संकेतव्यवहार हे अन्य साहित्यप्रकाराच्या तुलनेने खूपच खुले असतात. यामुळे त्यामध्ये येणारी सर्वसमावेशकता ही बाब विशेष महत्त्वाची ठरते. कादंबरीत असणाऱ्या सर्वसमावेशक वृत्तीमुळे ती स्वत:च्या विकासात कथा, कविता आणि नाटक या साहित्यप्रकारातील घटकतत्त्वांचाही चलाखीने वापर करत असते. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रक्रियेत ती त्याचवेळी स्वत:ची एक स्वतंत्र व्यवस्थादेखील निर्माण करत असते. याचे मुख्य गमक हे कादंबरीच्या सर्वसमावेशक आणि खुल्या अशा संरचनाव्यवस्थेबरोबरच तिच्या भाषिक अवकाशाच्या अतिव्याप्त धोरणांमध्ये देखील शोधता येईल. किंबहुना कादंबरीच्या साऱ्या क्षमता ह्या कादंबरीच्या भाषिक अवकाशाच्या व्यापापासूनच सुरू होतात.

कादंबरी या साहित्यप्रकाराच्या भाषेसह अन्य काही आविष्कार घटकांबाबत विचार करताना कथानकरचना, पात्रयोजना, कथनव्यवस्था इ. घटक केंद्रस्थानी येतात. या आविष्कार घटकांच्या आधारे कादंबरीकार आपली कादंबरी रचत असतो, आकाराला आणत असतो. या घटकांचा जेव्हा कादंबरीकार खूप सरळपणे आपल्या कादंबरीत वापर करत असतो तेव्हा कादंबरी ही पारंपरिक प्रारूपाने वाढत जाते. आणि जेव्हा आशयसापेक्षतेमुळे आविष्कारतंत्रात बदल होतात तेव्हा कादंबरी प्रयोगशील होऊ लागते. म्हणजे प्रचलित कादंबरीलेखनात कथानकरचना, पात्रयोजना, कथनव्यवस्था आणि भाषा उपयोजन ह्या गोष्टी पारंपरिक रचनातंत्राला, रूढ संकेतबद्धतेला अनुसरत सिद्ध होताना अनुभवास येतात. अशावेळी कादंबरी निश्चित अशा

# ARTICLE

संकेतबद्धतेला शरण जात असते. याच प्रक्रियेला शह देण्याच्या भूमिकेतून कादंबरीच्या रूपरचनेबाबत दक्ष असणाऱ्या कादंबरीकारांकडून कादंबरीमध्ये प्रयोग होतात. कादंबरीत प्रयोग होतात याचा अर्थ कादंबरीच्या आविष्कार घटकात प्रयोग होत असतात. (परंतु याचवेळी एक ध्यानात घ्यायला हवे की, कादंबरीतील मूल्ययुक्त प्रयोगाच्या मुळाशी कादंबरीकाराचा अनुभवविश्वाकडे पाहण्याचा नावीन्यपूर्ण दृष्टिकोन, कादंबरीसाठी निश्चित केलेले आशयविश्व काम करत असतात.) अशातून निर्माण होणारी कादंबरी मग प्रयोगशील होऊ लागते. कादंबरीच्या वरील आविष्कार घटकात आशयव्यवहाराच्या मागणीतून मोडतोड झाली असेल, संकेतव्यवस्थेत बदल सूचविले गेले असतील तर संबंधित बदलाला मूल्ययुक्त प्रयोग म्हणून ओळखता येईल. अशा प्रयोगांच्या यशस्वीतेतून मग कादंबरीच्या रूपरचनेत बदल संभवतात. यातून कधी कधी कादंबरी या साहित्यप्रकाराच्या देखील कक्षा रूंदावतात. साहित्यप्रकारात एक विकास संभवतो. परंतु अशा प्रयोगांच्या फसण्याच्या शक्यता ह्या यशस्वी होण्याच्या प्रमाणाहून जास्त असतात. अर्थात कादंबरीत प्रयोग होतात म्हणजे ते कादंबरीच्या आविष्कार घटकांशीच संबंधित असतात, हे ध्यानात घ्यायला हवे.

एकूणात कादंबरीचा रूपबंध हा कथानकरचना, पात्रयोजना, कथनव्यवस्था आणि भाषेच्या उपयोजनेसह घडत असतो. या घटकांचा एकमेकांवरती होणाऱ्या प्रभावातून, परिणामातून, एकमेकांचे प्रभाव पचविण्याच्या प्रक्रियेतून कादंबरीचा रूपबंध आकारत असतो. असे असले तरी कादंबरीच्या ज्या काही महत्त्वाच्या आविष्कारघटकांमधून कादंबरीचा रूपबंध आकारत असतो त्यामध्ये कादंबरीच्या भाषेला विशेष असे महत्त्व आहे. मुळात कादंबरीच्या संरचनाव्यवस्थेत पहिल्यांदा पृष्ठस्तरावरती येते ती म्हणजे कादंबरीची भाषाच होय. ''भाषा हा कादंबरीच्या संरचनेचा आणि पर्यायाने रूपबंधाचा सर्वात महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण असा घटक आहे. कादंबरी हे कथनरूप शेवटी भाषेमधून मूर्त रूप धारण करत असते. कथा आणि निवेदक ही या भाषेतून साधलेली अमूर्तीकरणे असतात... कादंबरीच्या रूपबंधाच्या संदर्भात अंतिम आणि मूर्त उत्पादन भाषिक संहिता हेच असते. येथे कथनात्म संहितेच्या अगोदर कथा आणि निवेदक यांच्या व्यवहारांची उपस्थिती गृहीत धरलेली असली, तरी वाचकाला सर्वात प्रथम भेटते ती कथनात्म संहिता, म्हणजे विशिष्ट प्रकारची भाषाच.''[१] याचा अर्थ कादंबरीच्या रूपबंधात कादंबरीतील भाषा या आविष्कारघटकाचे महत्त्व किती मोठ्या प्रमाणात असते याची प्रचिती वरील अवतरणातून येण्यास मदत होईल.

कादंबरी आणि भाषा याचा वरील पद्धतीने विचार करताना पुन्हा कादंबरीत योजिलेली भाषा ही कादंबरी पुढे न्यायला, कथा नेमकेपणाने रचायला, आशयसूत्रांची प्रभा वाढवायला कितपत मदत करते इ. गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. कारण कादंबरीच्या निर्मितिप्रक्रियेत भाषेचे होणारे उपयोजन कादंबरीतील आशयसूत्रांशी महत्त्वपूर्ण संबंध प्रस्थापित करत असते. कादंबरीनिर्मितीत नेमकेपणाने झालेले भाषा उपयोजन ही गोष्ट

## ARTICLE

कादंबरीच्या अवकाशविस्तारात तर वाढ करते. कादंबरीतून योजिलेली भाषा ही कादंबरीच्या आशयाचाच एक भाग होऊन कादंबरीतील आशयसूत्रांचा व्याप वाढविते. कादंबरीतील भाषेच्या अनुषंगाने वरील विचार गृहीत धरला तर 'कादंबरी' आणि 'भाषा' याचा असलेला सहसंबंध किती घट्ट असतो, याचा एक अंदाज बांधता येईल.

२

कादंबरी आणि भाषा असा सहसंबंध स्पष्ट करताना एका गोष्टीचे सतत भान ठेवावे लागणार आहे ती म्हणजे या साहित्यप्रकाराच्या भाषिक अवकाशाची व्याप्ती. मुळात या साहित्यप्रकाराचाच व्याप इतका मोठा आहे की, तो मानवीसृष्टीतील कोणतीही घटना, प्रसंग, गोष्ट आपल्यात सामावून घेऊ शकतो. एकाचवेळी कादंबरी मानवी जीवनव्यवहारातील अनेक घटना-प्रसंग, आशयसूत्रं सहजपणे घेऊन येते. अर्थात कादंबरीत अशा अर्थाची अमर्याद ताकद तिच्या विस्तृत भाषिक अवकाशातून निर्माण होत असते. ''भाषिक अवकाशाच्या संदर्भात कादंबरीवर कोठल्याही मर्यादा नाहीत. ती कितीही प्रदीर्घ असू शकते. कादंबरीचा शेवट वाचताना प्रारंभीचा भाग वाचक पूर्णपणे विसरू नये इतपत काळजी भाषिक अवकाशाच्या संदर्भात घेतली गेली की भागते. थोडक्यात मानवी स्मृतीला असलेल्या मर्यादा कादंबरीच्या भाषिक अवकाशाला असतात. तात्त्विकदृष्ट्या कादंबरीच्या भाषिक अवकाशाची कमाल मर्यादा मानवी आयुष्याएवढी मानायला काहीच हरकत नाही.''[२] एकूणच कादंबरीच्या आशयाच्या स्वरूपाला अन्य साहित्यप्रकारासारखे कोणतेही बंधन नसल्याने आणि अशी परिस्थिती ही कादंबरीच्या स्वरूपविशेषांमध्ये असल्याने कादंबरी कोणतीही गोष्ट आपल्यात सामावून घेण्याइतपत सक्षम होते. त्याच स्वरूपविशेषाचा भाग म्हणून कादंबरीतील भाषिक अवकाशाचा विचार करावा लागेल. त्याचाच परिणाम म्हणून कादंबरी ही एका व्यक्तीच्या एक-दोन तासाच्या, एका दिवसाच्या कालावकाशापासून माणसांच्या दोन-तीन किंबहुना त्याहून जास्त पिढ्यांचे चित्रण एकाचवेळी करू शकते.

कादंबरी या साहित्यप्रकाराची भाषा आणि अन्य साहित्यप्रकाराची भाषा यांच्यात एक तात्त्विक अंगाने फरक सांगता येईल. प्रत्येक साहित्यप्रकाराच्या भाषेबाबत विचार करताना ही गोष्ट प्रकर्षाने स्पष्ट होते की, त्या साहित्यप्रकारातील काही स्वरूपविशेषांचा परिणाम हा संबंधित त्या-त्या साहित्यप्रकारातून वापरल्या जाणाऱ्या भाषेवरती होत असतो. साहित्यप्रकाराच्या संरचनेवरून जसे एखाद्या साहित्यप्रकाराची ओळख पटू शकते तसे भाषेच्या परीक्षणावरूनही संबंधित मजकूर हा कोणत्या साहित्यप्रकाराशी नाते सांगतो याचा एक अंदाज बांधता येतो. इतकी त्याची म्हणून शैली किंवा संकेतबद्धता ही त्या-त्या साहित्यप्रकारांशी निगडित व्यक्त होत असते. याचा अर्थ कादंबरीशिवायच्या अन्य साहित्यप्रकारातून व्यक्त होणारी भाषा ही खूप ठळकपणे त्या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये, रूप, शैली लेऊन अभिव्यक्त होत असते. परंतु असे कादंबरी या साहित्यप्रकाराबाबत घडत नाही. कादंबरी ही जशी अन्य घटाकांगांच्या अनुषंगाने जितकी खुली आणि स्पष्ट

आहे तितकीच ती कादंबरीतील भाषेच्या उपयोजनेबाबत देखील खुली आहे. कादंबरीची तिची म्हणून स्वतःची अशी भाषा अथवा शैली नाही. अर्थात कादंबरी मानवी जीवनव्यवहारांशी संबंधित कोणताही आशय, कोणताही प्रदेश, कोणतेही कथासूत्र जशी आपलीशी करते तशी कोणत्याही स्वरूपाची भाषादेखील तिला वर्ज्य नाही. भाषेच्या कोणत्याही स्वरूपाचे नमुने कादंबरी आपल्यात सामावू शकते, इतका कादंबरीचा पैस हा खुला असतो. कादंबरीतील भाषिक पातळीवरील खुलेपणाला अधोरेखित करताना हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''कादंबरीचे निवेदन पात्रमुखी असो वा नसो, तीमध्ये पात्रांची संभाषणे कमी असोत वा जास्त असोत; कादंबरीमध्ये एकात्म अशी, विशिष्ट शैलीने युक्त अशी भाषा सर्वत्र आढळणे कठीण असते. शैलीविज्ञानाला अभिप्रेत असलेल्या लेखकाच्या किंवा साहित्यप्रकाराच्या शैलीला, तिच्या पृथगात्मतेला, तिच्या एकात्मतेला कादंबरी सतत विरोध करत राहते. लेखकाची स्वतःची अशी भाषा कादंबरीमध्ये शोधता येत नाही; याचे मूळ कादंबरीच्या, भाषेमध्ये असलेल्या अनेकविधतेला खुलेपणाने सामोरे जाण्यात आहे.''[३] याचा अर्थ कादंबरीमध्ये नानाविध स्वरूपाची संभाषिते ही सहजपणे प्रवेश करू शकतात इतकी तिची ताकद अमर्यादित असते. कादंबरी या साहित्यप्रकाराचा भाषिक पोत असा अनेकविध होण्यामागील एक कारण पुन्हा कादंबरी या साहित्यप्रकाराच्या खुलेपणातच दर्शविता येतो. कादंबरी ही मुळात खूप मोठा विस्तार आणि व्याप आपल्यात सामावून घेणारी असते. पुढे जाऊन असे म्हणता येईल की, कादंबरीचे सतत समकालीन असणे आणि सर्वकाळातील जीवनव्यवहार आपल्यात उभे करण्याची तिच्यात जी ताकद असते त्यातूनही कादंबरीचा भाषिक पोत विस्तारतो.

कादंबरी या साहित्यप्रकाराच्या लवचीक असण्याच्या, व्यापक असण्याच्या शक्यता कादंबरीतील भाषिक अवकाशाचा विस्तार करत असतात, असे एकीकडे म्हणता येईल. दुसरीकडे कादंबरीची जी काही वैशिष्ट्ये निर्माण होतात ती कादंबरीच्या व्यापक अशा भाषिक अवकाशांमुळेच होय, असेही म्हणता येईल. कादंबरी या साहित्यप्रकारात जशा बहुविध गोष्टी एकत्रित येत असतात तशा कांदबरीच्या भाषेतही बहुविध स्वरांचा अंतर्भाव होत असतो. याचा अर्थ कादंबरी आणि कादंबरीत योजिली जाणारी भाषा ह्या गोष्टी एकमेकांवरती प्रभाव करत, एकमेकांचा प्रभाव पचवत अस्तित्वात येत असतात. कादंबरीची भाषा ही कादंबरीत येताना कशी येत असते हे सांगताना मिखाईल मिखालोविच बाख्तिन 'कादंबरी आणि कादंबरीची भाषा' यावरती मार्मिक टिप्पणी करताना म्हणतात, ''कादंबरी काही सामान्यजीवनाचे सविस्तर इतिवृत्त असत नाही. कादंबरीची भाषा म्हणजे संपूर्णपणे तयार वस्तू नसते. आपल्यापुढे ती येते ती विविध आणि विरोधी वाढणाऱ्या, वळणे घेणाऱ्या प्रवाहासारखी. कादंबरीत विविध स्वर नवनवी रूपे धारण करूनच विकसित होतात. पण त्यावेळी ती जीवनाची विविध प्रतीकेही आपल्या पुढे ठेवते.''[४] यावरून असे ध्यानात येते की, कादंबरीची

## ARTICLE

भाषा ही पुन्हा कादंबरीतील विविध घटकांना अर्थपूर्णता देण्याच्या प्रक्रियेतही खूप मोलाची मदत करत असते. कादंबरीची भाषा हे कादंबरीतून व्यक्त होते तेव्हा ती काही एकसलगपणे एखाद्या तयार वस्तूसारखी व्यक्त होत नाही. त्याची होणारी घडण ही कादंबरीत जे विविध घटक असतात त्यांना प्रतिक्रिया देतच वाढत असते. यातून कादंबरीत विविध स्वर हे नानास्वरूपाची रूपे घेऊन विकसित होतात. हे जरी खरे असले तरी कादंबरीत वाढणारी विविधांगी मते-भूमिका अथवा याला विरोधी वाहणारी मते ही पुन्हा कादंबरीच्या कथासूत्र, पात्रयोजना, कादंबरीतील कथनपद्धती यांच्यातूनच आकारत असतात. अर्थात या सगळ्यांच्या हातात हात घालून तर कधी या सगळ्यांच्या कृतीला मूर्त रूप देत कादंबरीची भाषा सिद्ध होत असते. यावरून हे ध्यानात येते की, कादंबरीची भाषा ही खूप गुंतागुंतीतून निर्माण होत असते. कादंबरी आणि समाजव्यवहार यातील विविध घटकांचा कादंबरीतील भाषेच्या उपयोजनावर परिणाम होत असतो. याचा अर्थ अशा विविधांगी गोष्टींच्या संस्करणातून वाढणारी कादंबरीची भाषा ही बहुविध स्वरांनी समृद्ध करणारी, कादंबरीच्या बाह्य आणि अंतःस्तरांना बळकटी देणारी, कादंबरीला सशक्तपणे उभी करणारी म्हणून कादंबरीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते.

कादंबरी आणि भाषा यामधील अशा अनोख्या-खुल्या संबंधामुळे कादंबरीतील भाषेबाबत अन्य साहित्यप्रकाराप्रमाणे स्वतःची अशी शैली निश्चित होत नाही. इतकेच नाही तर कादंबरी ही व्याकरणशुद्धतेचा दाबदेखील नाकारते. म्हणूनच मॅनेजर पांडेय म्हणतात, ‘‘कादंबरीत भाषेतली लोकशाही विकसित होते, जी व्याकरणशुद्धतेची हुकूमशाही झुगारून देते.’’[५] कादंबरीतील भाषेच्या अशा नानाविध विशेषांमुळेच तिची म्हणून कोणती शैली पक्की होत नाही. किंवा तिच्याविषयी कोणते थेट अंदाज बांधता येत नाहीत. कादंबरीची स्वतःची म्हणून साहित्यप्रकारनिष्ठ शैली निर्माण न होण्याच्या कारणामुळेच कादंबरीच्या भाषेची शैली कविता किंवा अन्य साहित्यप्रकारांच्या निकषाधारे बांधता अथवा तपासता येत नाही. परंतु याचे भान आपल्याकडील कित्येक थोर शैलीवैज्ञानिकांना उरत नाही. कवितेची शैली ध्यानात घेणाऱ्या अभ्यासपद्धती/निकषव्यवस्थेतून कादंबरीची शैली तपासण्याचा प्रयत्न मराठीमध्येही सतत होत आलेला आहे. अशा चुकीच्या पद्धतीने कादंबरीची शैली तपासण्याचा प्रयत्न हा चकवा निर्माण करणारा ठरतो. कादंबरीत अनेकविध स्वरांना असणारी जागा ही अनेकविध पात्रांच्या एकत्रित येण्याने निर्माण होत असते. यातून कादंबरी ही बहुस्वरीय होणे स्वाभाविक आहे.

कादंबरीत एकाचवेळी निर्माण होणारे अनेक स्वर हे एकमेकांना कधी छेदत तर कधी समांतर असे निघत असतात. कारण कादंबरीतील भाषिक घडण समजावून घेतली तर हे स्पष्ट होते की, चांगल्या कादंबरीची भाषा ही इतक्या निरनिराळ्या दिशेने फाकत जात असल्याकारणाने कादंबरीच्या भाषेचे कोणत्यातरी एका सूत्राच्या आधारे केले जाणारे विश्लेषण फसू शकते. यासंदर्भात हरिश्चंद्र थोरात यांचे एक टिपण महत्त्वाचे वाटते.

## ARTICLE

''कादंबरीला स्वतःची अशी भाषा नाही. खास तिचे असे शैलीविषयक संकेत नाहीत. कवितेच्या भाषेवर पोसलेले शैलीविज्ञान यामुळेच कादंबरीच्या संदर्भात नेहमीच अपुरे आणि असमाधानकारक ठरत आले आहे. एका विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार म्हणून कादंबरीच्या भाषेकडे पाहता येत नाही. कादंबरीमध्ये भाषेची विविध रूपे सहजतेने प्रवेश करू शकतात. विविध संभाषितांचा मेळ तिच्यामधून साधला जाणे शक्य असते. या मेळामधूनच कादंबरीचा रूपबंध मूर्त होत असतो.''[६]

कादंबरी आणि भाषा यांचा वरील अर्थाने विचार करताना एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, सरसकट लिहिल्या जाणाऱ्या सर्वच कादंबऱ्यांतील भाषा ही अशा तऱ्हेने सशक्त प्रवास करते असे नाही. किंवा सर्वच कादंबऱ्या ह्या वरील अर्थाने अनेकआवाजी दिशेने वाटचाल करतात असेही नाही. हे सर्व त्या-त्या कादंबरीकाराच्या वकूबानुसार घडत असते. कादंबरी ही अनेक आवाजी होऊ शकते, तशी ती करता येते. विविध आवाज एकाचवेळी कादंबरीत खेळविता येतात याचे उत्तम भान हे कादंबरीकाराला असायला हवे. त्याचवेळी मग संबंधित कादंबरी ही अनेक आवाजीपणाकडे सरकायला लागते. अन्यथा कादंबरी एकआवाजी, सरधोपट व्हायला वेळ लागत नाही.

पर्यायाने अनेकआवाजी स्वरूपाच्या कादंबऱ्यांची निर्मिती ही मुळात कादंबरी आणि कादंबरीत वापरल्या जाणाऱ्या भाषेबाबतचे अचूक भान असणाऱ्या कादंबरीकारांकडूनच निर्माण होऊ शकते. कादंबरीत वापरल्या जाणाऱ्या भाषेविषयीचे नेमके तत्त्वज्ञान कळलेल्या कादंबरीकारांकडून वरील अर्थाच्या कादंबऱ्या लिहिल्या जातात. 'कादंबरीत भाषेचे काही करावे लागते' हे ज्या कादंबरीकाराला कळलेले असते अशांच्या कादंबऱ्यात भाषा उपयोजनाच्या काही पोक्त खुणा सापडण्याच्या शक्यता असतात. अशाच कादंबरीकारांकडून भाषा-उपयोजनाचे काही प्रयत्न होत असतात. अशासाठी जेव्हा कादंबरीच्या भाषिक तत्त्वज्ञानाची माहिती असणं जितकं महत्त्वाचं तितकंच कादंबरीकाराला भाषेच्या सामाजिक-ऐतिहासिक परिस्थितीची देखील चांगली ओळख असायला हवी. एखाद्या समाजातील समाजव्यवहार आणि भाषाव्यवहार आतून कळलेला असायला हवा. कारण ''कोणत्याही भाषेच्या आत सामाजिक बोलींचे अनेक स्तर असतात. त्यांच्यात त्या त्या पेशाशी संबंधित शब्दप्रयोग, वेगवेगळ्या पिढ्यांची भाषा, शिव्यांची भाषा, अधिकाऱ्यांची भाषा, अशा अनेकींचा समावेश असतो. आणि या सगळ्यांचं सामाजिक, राजकीय प्रयोजनसुद्धा असतं. भाषेच्या या ऐतिहासिक परिस्थितीची जाण कादंबरी लिहिताना आवश्यक असते. बोलींच्या सामाजिक अनेकतेच्या माध्यमातून कादंबरी वस्तू, विचार, भावभावना यांच्या दुनियेची समग्रता व्यक्त करीत असते. त्यातून आपल्या पात्रांच्या स्वरांची स्वतंत्रताही कायम ठेवत असते.''[७]

## ARTICLE

३

मराठी कादंबरीलेखनाच्या सुरुवातीपासून आजतागायत लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्या पाहिल्या तर काही मोजक्या कादंबऱ्यांचा अपवाद वगळता कादंबरीलेखनासाठी अपेक्षित असलेल्या उत्तम भाषिक भानाच्या खुणा खूपच कमी सापडतात. भाषेबाबतची काहीएक चांगली जाण साठनंतरच्या कादंबऱ्यात तुकड्या-तुकड्याने दिसत असली तरी तीही पुढे खूप चांगल्या पद्धतीने विकसित झाली, असेही म्हणता येत नाही. त्याचाच परिणाम आज लिहित असलेले असंख्य कादंबरीकारही (परंपरेचा प्रभाव आणि परिणाम म्हणून की काय) कादंबरीतील भाषा उपयोजनाबाबत पुरेसे दक्ष दिसत नाहीत.

साठपूर्व काळातील मराठी कादंबरीतील भाषाउपयोजनाची स्थिती एकारलेली, विशिष्ट संकेतात बांधली गेलेली होती. याबाबतचे विश्लेषण अनेक कादंबरी टिकाकारांनी नोंदवून ठेवलेले आहे. साठपूर्व काळात अपवाद वजा करता बहुतांश कादंबऱ्या ह्या प्रमाणभाषेच्या अधीन राहूनच लिहिल्या गेल्याचे चित्र पुढे येते. कादंबरी हा साहित्यप्रकार वरती नोंदविल्याप्रमाणे कोणत्याही स्वरूपाची भाषा खुलेआम आपल्यात सामावून घेऊ शकतो याची सुतराम माहितीदेखील या काळातील कादंबरीकारांना नव्हती. मुळात कादंबरी या साहित्यप्रकाराच्या विविध शक्यतांच्या बाबतीत देखील अज्ञानी असा हा काळ होता. त्यामुळे या काळात लिहिल्या गेलेल्या कादंबरीतील भाषा ही घडीव, चाकोरीबद्ध अशा वळणाने जाणारी होती. अलंकृततेने आवश्यक नसताना सजवली गेलेली, जाणीवपूर्वक बनवल्या गेलेल्या लेखकीय भाषेच्या वळणात लिहिली गेलेली असे काहीसे चित्र साठपूर्व मराठी कादंबरीचे उभे राहते. यामध्ये आपल्याला लक्ष्मणशास्त्री हळबे, नारो सदाशिव रिसबूड, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, ग.त्र्यं.माडखोलकर, पु.य.देशपांडे, गीता साने, प्रेमा कंटक इत्यादींनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता येईल.

याशिवाय मराठी कादंबरीकारांच्या कादंबरीतील भाषा उपयोजनेच्या बाबतीत आणखी एक निरीक्षण नोंदविणे महत्त्वाचे वाटते ते हे की, या काळात लिहिणाऱ्या बहुतांश कादंबरीकारांची आणि नंतरच्याही कित्येक कादंबरीकारांची त्यांची म्हणून असलेली एक छापयुक्त भाषा दर्शनास येते. अर्थात स्वतःच्या अशा त्यांच्या म्हणून शैलीचे स्वरूप कादंबरीला प्राप्त झालेले दिसून येते. याचा अर्थ कादंबरीलेखन ही फक्त साहित्यिक अशा प्रमाण भाषेतच आडकलेली नव्हती तर काही कादंबरीकारांची त्यांची म्हणून एक चाकोरीबद्ध भाषारचना वर्तुळासारखी कादंबरीत फिरत असल्याचे लपवता येत नाही. या काळातील कादंबऱ्या वाचायला लागल्या की, काहीएका परिचयाची आणि लेखनातील त्याच-त्याच वळणांभोवती फिरणारी भाषा प्रत्ययास येते. यातून मग विशिष्ट कादंबरीकारांच्या विशिष्ट अशा लकबी, शब्दयोजनांची शैली, वाक्यरचनेची पद्धत ह्या गोष्टी पुन्हा-पुन्हा कादंबरीभर आवृत्त होत राहतात.

# ARTICLE

एकूणच १९६० पूर्व काळातील कादंबरीत योजिली जाणारी भाषा ही लोकप्रिय आणि रंजनप्रिय लेखनपद्धतीला बळी पडलेली होती. ह्या पठडीतल्या कादंबऱ्या ह्या जुजबी विषयावरती वाढून मार्गक्रमण करत राहिलेल्या दिसून येतात. कादंबरीतील शब्दयोजना, वाक्यरचना ही मोहक आणि रंजनकतेच्या नमुन्यानुसार चालणारी, तितकीच आंलकारिक आणि सुभाषितप्रचुरतेचे ढोंग वाढवत नेणारी अशी होती. यातून भावनांचा कोरडा सूर आळवत राहण्यापलीकडे मराठी कादंबरी भाषेची मजल जात नव्हती.

१९६० पूर्वी लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांचे भाषिक उपयोजनाच्या आधारे दोन स्तर पाडता येतात. म्हणजे कादंबरीलेखनाच्या सुरुवातीपासून ते इ.स.१९२० पर्यंतचा एक आणि १९२० ते साठपूर्व काळ. पहिल्या स्तरात मराठी कादंबरी ही नको तितकी अद्भुत-अवास्तवाला स्पर्श करत लिहिली गेली आहे. यामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात *मुक्तामाला, मजुंघोषा, वसंतमाला, वसंतकोकिला, रत्नप्रभा, मदनमंजिरी* इ. कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. संकटे, साहस, यांची रेलचेल वाढवत विशिष्ट आविर्भावातील कृत्रिम-कोट्यायुक्त-संस्कृतप्रचूर शब्दयोजना करत मंनोरंजनात्मक पातळीवर उतरणाऱ्या आणि अवास्तव विषयाच्या अंगाने वाढणाऱ्या कादंबऱ्या ह्या काळात लिहिल्या गेल्या. याच स्वरूपाची सुधारित आवृत्ती म्हणून १९२० नंतर लिहित्या झालेल्या कादंबरीकारांकडे पाहता येईल. या काळातील अशा वळणाचे बिनीचे कादंबरीकार म्हणून आपल्याला ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, ग.त्र्यं.माडखोलकर, गीता साने, प्रेमा कंटक, ग.ल.ठोकळ, पुढे श्री.ना.पेंडसे, गो.नि.दांडेकर ह्याही मंडळींची नावे घ्यावी लागतील. साठपूर्व फडके, खांडेकर, माडखोलकर ह्या तिघांनी कादंबरीतील भाषिक उपयोजनाबाबत जी चमकदार, वाचनीय, शैलीदार पातळीवरचे वळण घेतले ते तत्कालीन काळात तर परिणाम करणारे ठरलेच, शिवाय त्यापुढच्या काळातही त्यांच्या लेखनशैलीच्या छायेत राहून बहुतांश कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. शब्दबंबाळपणा, कृत्रिमता, अंलकारिकता, सुभाषितप्रचूर असे काही भाषाविशेष-शब्दविशेष या काळातील कादंबऱ्यांबाबतीत नोंदवावे लागतील.

ही तुलना पुन्हा 'साठपूर्व मराठी कादंबरी' आणि 'साठोत्तर मराठी कादंबरी' असे करायचे ठरवले तर कादंबरी आणि भाषा उपयोजन याबाबत काही वेगळे निरिक्षण हाती येतात. साठपूर्व कादंबऱ्यांच्या भाषायोजनेच्या स्वरूपाचे साठोत्तर काळातील कादंबऱ्यांच्या भाषा योजनेशी तुलना करता कादंबरीतील भाषिक चित्र (चांगल्या अर्थाने) बहुतांश पातळीवर बदललेले पाहावयास मिळते. साठोत्तर काळात काही गंभीरपणे लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यात येणारी भाषा ही कादंबऱ्यांची अर्थपूर्णता वाढविण्यास मदत करणारी, कादंबरीतील आशयाला अनुरूप अशी उतरत आलेली दिसते. १९६० नंतर बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय पर्यावरणाचा भाग म्हणून काही नव्या गोष्टी आल्या. समाजव्यवहारात विविध चळवळींनी जोर धरला. यातूनच मग संबंधित चळवळीतून त्या-त्या विचारांशी निगडित साहित्यांचे प्रवाह निर्माण झाले. यातून खूपसे लोक लिहिते झाले. पूर्वी साहित्यानिर्मितीचे केंद्र हे विशिष्ट वर्ग, जातसमूह, प्रदेश अशा गोष्टींशी निगडित होते.

## ARTICLE

परंतु साठोत्तर काळात हे चित्र बदलू लागल्याने विविध प्रदेशातून, जातिधर्मातून, विविध वर्गांच्या माध्यमातून अनेकजन लिहिते झाले. हे जसे कविता, नाटक, कथा या साहित्यप्रकारातून घडत होते तसेच कादंबरी या साहित्यप्रकारातही घडत होते. त्यामुळे विविध स्वरूपाच्या, नानाविध विषयसूत्रांनी समृद्ध असलेल्या कादंबऱ्या साठनंतर मराठीमध्ये लिहिल्या गेल्याचे चित्र आहे. यातून मग प्रमाण भाषेच्या चाकोरीत अडकलेली मराठी कादंबरी ही मराठीच्या विविध बोलींना भिडू लागली. उद्धव शेळके, अण्णा भाऊ साठे, आनंद यादव, रा.रं.बोराडे, महादेव मोरे, शरच्चंद्र मुक्तिबोध, बाबूराव बागूल, जयवंत दळवी, शंकरराव खरात, चिं.त्र्यं.खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, अरुण साधू इ. अनेक कादंबरीकार या काळातील नोंदविता येतात की, ज्यांनी परिघावरील भाषेला कादंबरीत जागा निर्माण करून दिली. या मंडळींच्या कादंबऱ्या ह्या भाषेच्या योजनाबाबत, प्रतिरूपणाबाबत काही पारंपरिक संकेताना तडा देऊ शकल्या. अर्थात कादंबरी आणि भाषा यांच्या सहसंबंधात पूर्वी जी शैलीनिष्ठता, आलंकारिकता, साचेबद्धपणा यासारख्या काही गोष्टी होत्या त्यांचे प्रमाण उत्तरोत्तर ओसरतानाचे चित्र आहे.

पुढे १९८० नंतरचे चित्र तर याहून पुन्हा वेगळे आहे. यामध्ये पुरुषोत्तम बोरकर, नागनाथ कोत्तापल्ले, मोहन पाटील, राजन गवस, राजन खान, मधुकर वाकोडे, सदानंद देशमुख, अशा बगे, कविता महाजन, मेघना पेठे, आनंद विनायक जातेगावकर, जी.के.ऐनापूरे, आनंद विंगकर, कमलेश वालावलकर, गणेश दिवटे, कृष्णात खोत इ. मंडळींनी कादंबरीतील भाषा उपयोजनेबाबत उरल्या-सुरल्या संकेतशरणतेला थेटपणे झुगारताना दिसतात. स्वतःचा अनुभवविश्व आणि कादंबरीची भाषा यामध्ये कोणत्याही स्वरूपाचा पडदा ठेवू पाहत नाहीत. (परंतु पुन्हा १९८० नंतरच्या कादंबऱ्या ह्या वास्तववादी चित्रणाच्या प्रभावातून वेगळ्याच पेचात सापडल्या आहेत. याबाबतचे एक वेगळेच विश्लेषण शक्य आहे.) एकूणच साठनंतर मराठी कादंबरीने कादंबरी भाषेबाबत घेतलेले हे वळण लक्षणीय स्वरूपाचे जरी असले तरी चांगल्या कादंबरीसाठी इतकेच पुरेसे नसते. हे सर्व साठपूर्व कादंबरीलेखनाशी तुलना करता महत्त्वपूर्ण वाटत असले तरी कादंबरीविकासासाठी अपेक्षित अशी भाषिक समज ही अजून कच्चीच राहिली आहे. चाकोरीबद्धतेला ओलांडत, अनुभवविश्वाला भाषा भिडवत साठनंतरची कादंबरी लिहिली गेलेली असली तरी या काळातील कादंबरीलेखनाची मजल ही 'मिळालेल्या भाषेला' प्रामाणिक राहणे इथपर्यंतच जाते. वरील मंडळींनी आपल्या कादंबरीत योजिलेली भाषा ही सतत कादंबरीतील जीवनानुभवांशी स्पर्श करत राहिली असली तरी ती एका विशिष्ट अशा मर्यादितच अडकून राहते. कारण अशा अर्थाने भाषिक वेगळेपण जरी महत्त्वाचे असले तरी चांगल्या कादंबरीनिर्मितीस इतकेच पुरे नसते. साठनंतरच्या, ऐंशीनंतरच्या मराठी कादंबरीत ''बोली आल्या. खास सांकेतिक अशा साहित्यिक भाषेला नकार दिला गेला. हे चांगलेच झाले. कादंबरीच्या रूपबंधाच्या दृष्टिकोणातून भाषेचे जे करायला हवे ते अलीकडच्या मराठी कादंबरीने केले आहे, असे म्हणता येणार नाही. साहित्यिक भाषा काय, वैयक्तिक भाषाशैली काय,

## ARTICLE

किंवा बोली काय, या 'दिलेल्या' गोष्टी असतात. त्यांचे कादंबरीत काय करायचे, या प्रश्नाचे उत्तर बहुतेक कादंबऱ्यांजवळ नसते. या भाषांवर कलात्मकेतेचे संस्कार व्हावे लागतात. त्यांची जाणीवपूर्वक संरचना करावी लागते. मराठी कादंबरी या बाबतीत बरीच आळशी आहे. भाषेचा उपयोग केवळ संज्ञापनाचे साधन म्हणून करण्याची प्रवृत्ती तिच्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिरलेली आहे.''[८] कादंबरीत वापरली गेलेली भाषा ही फक्त दिलेली/मिळालेली भाषा म्हणून वापरली गेली तर त्याला विशेष महत्त्व प्राप्त होत नाही. त्याशिवायची अशी कलात्मक संस्कारांची आवश्यकता कादंबरीत योजिल्या जाणाऱ्या भाषेवर होणे गरजेचे असते. साठपूर्व कादंबरीहून साठोत्तर मराठी कादंबरी काहीएक पातळीवर जरी बदललेली आणि अर्थपूर्णतेच्या दिशेकडे सरकत असली तरी कादंबरीत भाषेचा 'दिलेली/मिळालेली भाषा' म्हणूनच वापर करण्यात मराठी कादंबरी धन्यता मानताना दिसते. त्यापलीकडे जात कादंबरीची प्रभा विस्तारण्याचे काम कादंबरी भाषेतून होत नसल्याचे चित्र लपत नाही. एकूणच कादंबरीतील भाषा उपयोजनेबाबतचे उत्तम आश्वासक रूप साठनंतरही दूर्मिळच राहिलेले आहे, असे म्हणावे लागते.

४

अशा अर्थाचे एक ठळक चित्र मराठी कादंबरीत सुरुवातीपासून आजतागायत दिसत असले तरी याच प्रवाहात आणखी एक चित्र मराठी कादंबरीविषयकच उभे राहते ते म्हणजे, काळाच्या प्रत्येक टप्प्यावर काहीएक चांगले कादंबरीकार मराठी कादंबरीच्या उदयापासून दाखवता येतात. साठपूर्व काळात जशी काही महत्त्वपूर्ण कादंबरीकारांची नावं बाजूला काढता येतात म्हणजे उदा. ह.ना.आपटे, श्री.व्यं.केतकर, वा.म.जोशी, र.वा.दिघे, विश्राम बेडेकर, विभावरी शिरूरकर, बा.सी.मर्ढेकर, व्यंकटेश माडगूळकर इ. तसेच साठनंतरही काही गंभीरपणे कादंबरीलेखन करणारे आणि कादंबरीतील भाषायोजनेविषयी देखील दक्ष असणारे कादंबरीकार म्हणून काही नावं बाजूला काढता येतात यामध्ये उदा. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, कमल देसाई, किरण नगरकर, वसंत आबाजी डहाके, मनोहर शहाणे, मनोहर तल्हार, दिनानाथ मनोहर, विलास सारंग, गौरी देशपांडे, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, शांता गोखले, अनिल दामले, सानिया, नंदा खरे, मकरंद साठे, विश्राम गुप्ते, प्रवीण बांदेकर इ.

साठपूर्व आणि साठनंतरची म्हणून वरती उल्लेखिलेल्या नावात आणखी काही नावं समाविष्ट करता येतील. काही नावं ही सीमारेषेवर देखील राहणारे आहेत. यामंडळींच्या कादंबरीत येणाऱ्या भाषेबाबत वेगळी मांडणी शक्य आहे. मात्र वरती उल्लेखिलेल्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून येणारे भाषेचे स्वरूप त्यांच्या समकालीनाशी तुलना करता वेगळे, अर्थपूर्ण आणि तत्कालीन कादंबरीलेखनाचा विकास घडवून आणणारी म्हणून अधोरेखित करावे लागेल. ती पारंपरिक कादंबरीत योजिल्या जाणाऱ्या भाषेहून आशयसंबद्ध आणि गंभीर वळणाने जाणारी आहे. यांच्या कादंबरीत जसे कादंबरीच्या रूपाचे भान दिसते तसे कादंबरीत योजिल्या जाणाऱ्या भाषेबाबतची समजही जाणवते. परंतु या कादंबरीकारांना देखील त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये हे भान

## ARTICLE

सातत्याने आणि सलगपणे पेलता आलेले नाही. यामध्ये स्वतः वापरत असलेल्या भाषिक रूपात स्वतःच अडकल्याची/रूतल्याची उदाहरणं देखील काही कमी नाहीत. म्हणजे वरील कादंबरीकारांची भाषेबाबतची दक्षता ही पुन्हा एका विशिष्ट टप्प्यावर जाऊन स्थिरावणारी किंबहुना थबकून राहणारी आहे.

कादंबरीतील भाषेचे जाणीवपूर्वक संरचना करणे, त्यावर कलात्मक संस्कार करणे म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. कादंबरीत योजिल्या जाणाऱ्या भाषेबाबत कादंबरीकाराला काय काय करण्याची आवश्यकता आहे, याबद्दल हरिश्चंद्र थोरात यांनी *कादंबरीविषयी* मध्ये नोंदविताना 'कादंबरीतील व्यक्ती ही नेहमीच बोलणारी व्यक्ती असते.' हे मिखाईल मिखालोविच बाख्तिन या रशियन विचारवंताचे विधान उद्‌धृत करून म्हणतात, "ही व्यक्ती बोलताना अर्थातच काही तरी भूमिका घेत असते. ही भूमिका भोवतालच्या जगाच्या संदर्भात असते. त्या व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण असतो. या भूमिकेतूनच तिची स्वतःची भाषा, स्वतःचे संभाषित तयार होत असते. कादंबरीमध्ये हे संभाषित केवळ प्रक्षेपित केले जात नाही, किंवा त्याची पुनःनिर्मितीही केली जात नाही. कादंबरीमध्ये या संभाषिताचे प्रतिरूपण केले जाते. हे प्रतिरूपण प्रामुख्याने लेखकाच्या/निवेदकाच्या संभाषिताच्या माध्यमातून होत असते. याचा अर्थ असा की कादंबरीच्या भाषिक व्यवहारामधून अनेक भूमिका, अनेक संभाषिते, म्हणजेच अनेक भाषा पुढे येत राहतात. या संभाषितांचे परस्परांशी असलेले संघर्ष, वाद, संवाद पुढे येत राहतील, अशा पद्धतीने त्यांचे संयोजन करणे आवश्यक असते. महत्त्वाची गोष्ट ही की या संघर्षामधून कादंबरीत अनेक 'आवाज' निर्माण होतात, व त्यांचे प्रत्यंतर कोठल्याही एका संभाषितामधूनही येऊ शकते."[१] कादंबरीतील अनेकावाजी संदर्भ वाढत जाण्याच्या प्रक्रियेत भाषेच्या विविध स्वरूपाचे होणारे प्रतिरूपण ही गोष्ट खूप मोलाची भूमिका बजावत असते. कादंबरीत येणाऱ्या व्यक्तिरेखा, ह्या सतत बोलत असतात. त्यामुळे त्यांना लागणारे भाषेचे द्रव्य कादंबरीकार कोणत्या कोणत्या निकषातून आणि कशा स्वरूपाने पोहचवतो यावर कादंबरीच्या कक्षा विस्तारण्याची प्रक्रिया अवलंबून असते. त्यामुळे 'दिलेली भाषा'/'मिळालेली भाषा' म्हणून कादंबरीत ती नियोजनशून्य वापरणे ही गोष्ट काही कादंबरीत मूल्ययुक्त जागा निर्माण करणारी ठरत नाही. आणि असेच काहीसे आपल्याकडील साठनंतरच्या कादंबऱ्यात झालेले आहे. शिवाय साठपूर्व कादंबऱ्यांशी तुलना करता काहीएक गोष्टी बदलल्या असल्या, एका अर्थाने कादंबरी भाषेला गंभीरपणे घेण्याची दृष्टी वाढली असली तरी खूपकाही समाधान करणारे चित्र नाही, असे म्हणणे भाग आहे.

कादंबरीकाराने कादंबरीत योजिलेल्या संभाषितांची मांडणी ही एकसुरी न होता विविध स्वरूपाचे संघर्ष, वाद, विवाद, संवाद अशा अनेक गोष्टी त्यातून पुढे येत राहिल्या पाहिजेत. कादंबरीत ह्या सगळ्यांना एकाचवेळी भूमी निर्माण करून देणे गरजेचे असते. परंतु आपल्याकडे कादंबरीचे असे चित्र आढळत नाही. बहुतांश

# ARTICLE

कादंबऱ्या ह्या एकसुरी विचाराला, कृतीला, नायकप्रधान व्यक्तिरेखेला, कादंबरीकाराने निश्चित केलेल्या काही विचारसरणीला बळकटी देत–एकाच एका भूमिकेला बळकट करत वाढत जातात. कादंबरीचे असे वाढणे हे विशेष गौरविण्यासारखे नाही, हे मान्यच करावे लागेल. आणि नेमके असेच काहीसे साठनंतरच्या मराठी कादंबरीकारांकडून आणि पर्यायाने कादंबरीबाबत घडलेले आहे. यातून मग एका विशिष्ट मर्यादेबाहेर कादंबरी खुली होत नाही, तिचे स्वरूप एकपदरी, एकआवाजी असे होऊन कादंबरीतील भाषा योजनेतही त्याच्या छटा दिसायला लागतात. यातून अलीकडील 'हिंदू–जगण्याची समृद्ध अडगळ' ही कादंबरी देखील सुटू शकली नाही. आपल्याकडील काही बरे लिहिणारे म्हणून आपण ज्यांचा उल्लेख करतो त्यातील भालचंद्र नेमाडे, विलास सारंग, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर इ. कादंबरीकारांना देखील एकसुरी, एकावाजीपणाचे वर्तुळ भेदता आलेले नाही. विशेषतः यामंडळींना कादंबरीतील भाषा उपयोजनाचे बरे भान आहे असे म्हणतानाच ती पुरेशी सशक्त नाही, हे देखील आवर्जून नोंदवावे लागेल.

– ग.रा.अपिने

**संदर्भ :**

१. थोरात हरिश्चंद्र : *कादंबरीविषयी*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प.आ., २००५, पृ. ६३.
२. थोरात हरिश्चंद्र : *कादंबरी : एक साहित्यप्रकार*, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प.आ., २०१०, पृ. ३४४.
३. तत्रैव, पृ. १८१.

४. शिरवाडकर के.र. : *साहित्यवेध*, मेहता पब्लि. हाऊस, पुणे, १९९८, पृ. १८४.

५. मॅनेजर पांडेय : *कादंबरी आणि लोकशाही*, अनु. रंगनाथ पठारे, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, २०११, पृ. ४५.

६. थोरात हरिश्चंद्र : *कादंबरीविषयी*, उनि., पृ. ६३.

७. बाख्तिन मिखाईल मिखालोविच : *कादंबरी आणि लोकशाही*, उनि., पृ. ४५.

८. थोरात हरिश्चंद्र : *कादंबरीविषयी*, उनि., पृ. ६४.
९. तत्रैव, पृ. ६४.

# UPCOMING EVENTS

## DECEMBER 2019

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 *Sant Jagnade Maharaj Jayanti*  | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

*Image Courtesy: Google*




*Image Courtesy: Google*

*All images in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Article*